ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# स्त्रीवाद आणि अर्थकारण

**डॉ. सुधिर सुरेश ढोरे**
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, सर परशुरामभाऊ कॉलेज,
टिळकरोड, सदाशिव पेठ, पुणे

**प्रा. संतोष अर्जुन शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व बीबीए महाविद्यालय,
वडगाव मावळ, ता मावळ, जि पुणे

**स्त्रीवादाची पार्श्वभूमी :–**

20 व्या ते 21व्या शतकापर्यंत वेगवेगळया सामाजिक व ऐतिहासिक असणाऱ्या स्त्रियांचे पद्धतशीरपणे होणारे शोषण हा कळीचा मुद्दा आहे. परंतु स्त्रिया या विविध सामाजिक, राजकिय, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्व भुमीमधून येत असल्याने त्यांचे शोषणाचे अनुभव सारखे नसतात. तसेच त्याला प्रतिकार करणारे स्त्रीवादी सिद्धांत सुद्धा एकाच प्रकारचे नसतात. म्हणूनच 'स्त्रीवाद' हा विभिन्न–विभिन्न पद्धतीने मांडला जातो. कारण 'स्त्रीवाद' हा शब्द देखील जगात सर्वत्र सारख्या पद्धतीने वापरला जात नाही. स्त्रियांमधील सामाजिक आणि प्रादेशिक भिन्नतेची दखल घेताना ळसवइंस व स्वबंस असा प्रश्नांकित करण्याचा प्रयत्न केला आहे.

1979 साली जाहीर झालेल्या Convention on The Elimination of all forms of Discrimination Against Women जाहीरनामा हा ज्तंदेदंजपवदंस स्त्रीवादी संघटना चळवळी आणि Campaigns यांच्या मुळाशी होता. तर वर्ण, वसाहत, वर्ग आणि लिंगभाव यांच्याशी संबंधित बदलत जाणारे सत्तासंबंध हे स्त्रीवादी सिद्धांताच्या शक्यता व मर्यादा यांना आकार देत होते.

**स्त्रीवाद संकल्पना :–**

स्त्रीवादी सिद्धांतामध्ये अनेक महत्वाच्या संकल्पनांचा समावेश होतो. फ्रेंच "Cn 'Female' (Woman) आणि राजकीय संदर्भात वापरला जाणारा शब्द यांना एकत्रित करून अमेरिकेतील 1970 च्या स्त्री चळवळीने संकल्पना पुढे आणली. दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी जरी ही संकल्पना प्रस्थापित केली तरी स्त्रीवाद म्हणजे नक्की काय याचा अर्थ ऐतिहासिकइ दृष्टया कधीच स्थिर किंवा स्थगित राहिला नाही. बदलत्या काळानुसार स्त्रीवादाचा अर्थ सुद्धा बदलत राहिलेला दिसून येत आहे.

**स्त्रीवादाची ऐतिहासिक सुरूवात :–**

पाश्चात्य देशांचा सुरूवातीचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, स्त्रिया या फक्त चूल आणि मूल या कौटुंबिक व्यवस्थेत अडकलेल्या दिसून येतात. त्यांना सार्वजनिक जीवनात स्थान नव्हते. तो फक्त पुरूषांचाच अधिकार समजला जात असे. मध्य युगात स्त्रियांना संपत्तीचा वाटा नव्हता आणि शिक्षणाची संधी नव्हती स्त्रियांचे सामाजिक स्थान, समाज जीवनातील सहभाग, योगदान व विविध प्रश्न आणि समस्या इ. बाबत विचारमंथन 18 व्या शतकात होवू लागले. आणि या विचारमंथनातून स्त्रीवादी विचार धारेचा उगम खऱ्या अर्थाने झालेला दिसून येतो. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान हक्क, समाज जीवनात सहभाग अशा अनेक प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले.

ज्ञानोदयाचा (इन्लाइटन्मेन्ट) प्रभाव स्त्रीवादावर पडला. त्यातूनच 'आम्ही साऱ्या एकत्र येऊन मिळून जाऊ' ही प्रबोधन काळातील स्त्रीवादी घोषणा गाजली. पण तिचे संलग्न चळवळीत कधीच रूपांतर झाले नाही. तेव्हा प्रसिद्ध फ्रेंच नाटककार 'ऑलॅप द गॉजिस' हिने 'डिक्लेरेशन ऑफ द राइटस् ऑफ विमेन ॲण्ड ऑफ द फोमेल सिटिझन (1971) हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या हक्कांची जाणीव करून स्त्री ही केवळ पुरूषांबरोबर समान नसून ती त्याची सहकारी सोबती आहे असे ठामपणे प्रतिपादन केले.

19 व्या शतकात स्थित्यंतराची आणि बदलाची मागणी युरोप व उत्तर अमेरिकेत होऊ लागली. पॅरिसमधील स्त्रीवादी महिलांनी 'द व्हाइस ऑफ विमेन' हे दैनिक काढले. (1848) आणि स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी, समान वेतन, समविभागणी अशा बहुविध प्रश्नांकडे या दैनिकाने समाजाचे लक्ष वेधून घेतले आणि स्त्रीवादाची सैद्धांतिक भूमिका मांडली. याच सुमाराम न्यूयॉर्क राज्यातील सेनेका फॉल्स येथे स्त्रियांच्या हक्कासाठी विद्वत्सभा भरली होती. यात 11 ठराव मांडले गेले. यात स्त्रियांच्या मतदानाचा आधिकार हा प्राधान्याने विचारात घेतला गेला.

'नॅशनल विमेन सफ्रेज असोसिएशन' ही मतदानाच्या संदर्भात जागतिक संघटना स्थापन केली. सुरूवातीस 1869 उच्चभ्रू व कामगार स्त्रियांत मतभेद झाले. तेव्हा लिंग भेदाच्या आधारे

स्त्रियांना दुय्यम स्थान न देता समान अधिकार दयावा याविषयी उठाव झाले आणि 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात अनुक्रमे देश परत्वे मतदानाचा हक्क प्राप्त झाला आणि त्यांचे काही हक्क ही मान्य झाले. स्त्रीवादाचा हा प्रसार–प्रचार पाश्चात्य देशांतून आशिया, अफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत प्रस्तृत झाला आणि पुढे विकसित राष्ट्रांबरोबरच त्याचे लोण अविकसित व विकसनशील देशांत सुद्धा पोहोचले.

**स्त्रीवादाची आधुनिक वाटचाल :–**

स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामागे जे पुरूषी राजकारण आहे. त्याचा बीमोड करणे हे स्त्रीवादाचे मुळ उद्दिष्ट आहे. स्त्रीवादांतर्गत अनेक गोष्टींचा अंर्तभाव होतो. पुरूषांइतकीच स्त्रीलाही स्वतःची ओळख आहे. स्वविकास, स्वतंत्रता यांची जरूरी आहे. स्वत्वाची ओळख, स्वायत्तता, स्वयंनिर्णय व सक्रिय सहभाग यामुळे त्या परिपक्व बनतात. त्या सर्व मिळवून देण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीत केला आहे. काळानुसार स्त्रीवादी चळवळीत जहाल, मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णीय वगैरे अनेक वेगवेगळया छटा असलेल्या विचारसरणींच्या बहुविध संघटना सामील झाल्या. अलिकडे आधुनिकेत्तर स्त्रीवाद, कृष्णवर्णी स्त्रीवाद, बहुसांस्कृतिक आणि वैश्विक स्त्रीवाद असेही विविध प्रकार पुढे येत आहेत. स्त्रीवादाच्या निरनिराळया सिद्धांतामध ून आणि त्यांच्या परस्पर संबंधातून जो विकास घडला त्याम ध ये स्त्रीच्या गोणत्वाला कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्ःतिक, राजकीय, मानसशास्त्रीय घटकांचा सखोल विचार करण्यात आला. अविकसित व विकसनशील देशांतील स्त्रियांच्या व्यथा आणि हक्क, शैक्षणिक समस्या, सामाजिक, मागासलेपणा इ. विषयांची दखल व चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने (न्छम्) कोचनहेमन (डेन्मार्क) येथे 'जागतिक परिषदेचे' आयोजन केले (1980) या परिषदेत जे काही ठराव झाले व धोरण ठरले त्याची प्रत्यक्षात कार्यवाही काय झाली, या विषयी 1994 मध्ये जागतिक महिला परिषद भरविण्यात आली. एकूण पाश्चात्य स्त्रीवादाच्या विचारसरणीत स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा मानसन्मान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता यावर भर दिला गेला. तथापि भारतात स्त्री विरूद्ध पुरूष अशी भावना भारतीय संस्ः तीत कधीच नव्हती. उलट स्त्रियांच्या उद्धाराचे प्रयत्न राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, अगरकर, न्यायमूर्ती रानडे, महर्षी कर्वे इ. पुरूषांनीच मोठया प्रमाणात सुरू केले. अंतिमतः स्त्रीवादाचा सर्वांगाने विचार केल्यास स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री–पुरूष समता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्री उद्धारासाठी अपरिहार्य ठरतात व यातूनच पुढील स्त्रीया प्रगत होवू लागल्या व त्यांचा प्रगतीतील वाटा वाढतच जात आहे.

**आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्त्रीवादी प्रवाहाची गृहीतके**

1) राजसंस्था आणि बाजारपेठ ही दोन्ही क्षेत्रे पुरूष दृष्टीकोनावर आधारभूत असतात. परिणामतः या व्यवस्था पुरूषांसाठी अधिक लाभदायक असतात.

2) राजकिय व आर्थिक व्यवस्था पुरूषांनी अंकित केल्यामुळे त्यात महिलांचे भरीव योगदान असूनही त्यांना कमी महत्त्वाचे स्थान मिळते.

3) स्त्री–पुरूष यांच्या वेगवेगळया दृष्टीकोनांचा अभ्यास न केल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रात अनेक त्रुटी निर्माण होतात.

**स्त्रीवादाची तीन प्रमुख सुत्रे :–**

1) समाजाने केलेल्या पद्धतशीर वंचनेमुळे स्त्रियांना आज तागायत आपले योग्य स्थान मिळू शकले नाही.

3) स्त्रीवादी चळवळीने वैचारिक संशोधन जरूर करावे परंतु त्याचा रोख समाज–परिवर्तनाकडे असला पाहिजे.

**स्त्रीवाद आणि सद्यस्थिती :–**

आजही स्त्रीयांना घटनेने कितीही अधिकार दिले तरी सुद्धा त्यांना समाजिक, धार्मिक विधी, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक आशा प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेण्यास त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. नुकतेच बिजिंग मध्ये जागतिक स्तरावर संपन्न झालेले 4 थे जागतिक संम्मेलनाचे घोषवाक्य होते, "महिलांच्या दृष्टीकोनातून जगाकडे पहा" सध्या महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे ही संकल्पना विकासाच्या संदर्भात आहे. पावलो फ्रिरे यांनी सर्वप्रथम ही संकल्पना उपयोगात आणली. यातूनच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी 33% जागा राखीव ठेवण्यासाठी 73 वी घटनादुरूस्ती 1990 करण्यात आली व महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध यमातून आर्थिक विकासाला चालना मिळाली.

भारतीय स्वातंत्र्यासाठी झाशीची राणी लक्ष्मीबाई, मादाम कामा, प्रितीलता वडेदार इ. अनेक स्त्रीयांनी मोलाचे योगदान दिले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधीनी उत्कृष्ट कार्य केले. स्त्रीवादी चळवळीची बीजे रोवण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी रोवली आणि आज त्यांचा वटवृक्ष झाला आहे. हे काम उल्का महाजन, मेधा पाटकर, डॉ. राणीबंग, मंदा आपटे इ. स्त्रीया अविरतपणे करित आहेत.

**स्त्रीवाद आणि आर्थिक बाबी** :– भारतातील बहुसंख्य स्त्रीया घरकामात गुंतलेल्या आहे. समाजात माणूस म्हणून जगायचे असेल तर, आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. एन्जेन्स म्हणतो, "जस जशी संपत्ती वाढली, तस तसा पुरूषांचा कौटुंबिक आणि बाहेरचा दर्जा स्त्रीयांच्या तुलनेत उंचावला व स्त्रीयांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला. पुढे प्रत्येक विभागात सरकारी विभागात जेंडर सेल उभारले गेले. त्यानुसार जेंडर बजेट ठरवण्यात येते. सद्यस्थितीत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा विचार करून बचत गटांना प्रोत्साहन दिले गेले व यातूनच महिला विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा मोठया प्रमाणावर उमटवू लागल्या आहेत.

**उदा** :– फोर्ब्सने 2019 मध्ये प्रभावशाली महिलांची यादी प्रसिद्ध केली आहे. यात अँजेला मार्केल, ख्रिस्तीन लगार्ड, नैन्सी पेलीसी, निर्मला सीतारामन, रोनशी नाडर, मलहोत्रा, किरण शॉ–मुझुमदार, शेख हसीना, चंदा कोचर, शोभना, भरनिया, प्रियंका चोप्रा, मेरीबारा इ. स्त्रियांनी जगाच्या संपूर्ण व्यासपीठावर आपल्या उत्कृष्ट कार्याचा ठसा उमटवीला आहे आणि यांनी कोटीच्या कोटी रूपयांची आर्थिक उलाढालीची उडाणे मारली आहेत.

**वास्तव** :– महिलांसाठी किती कायदे, योजना, राखीव जागा, समान वाटा ठेवला तरी सुद्धा अपेक्षित वेगाने महिलांचे स्थान उमटलेले नाही. सरकारी आणि खासगी नोकऱ्यांमध्ये धोरण ठरवणाऱ्या पदांपर्यंत खरच पोहचल्या का हा प्रश्नचिन्ह आहे. स्थानिक स्वराज्य संस्थानमध्ये आजही 'सरपंचपती' आणि 'सरपंचपुत्र' कारभार चालवतात. महिला केवल सही पुरत्याच आहेत. राज्यात सध्या चित्र बदलत आहे पण फार मंद गतीने बदलत आहे. महिलांसाठीचे कायदे कागदावरच मजबूत दिसतात. त्यांच्या अंमलबजावणीत प्रचंड उदासिनता दिसून येते. महिला विषयक गुन्हयांत गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण आजही अत्यल्प आहे. पारंपारिक डिसेंबरोबर ऑनलाईन छळ, सोशल मीडीया वरील ट्रोलींग, अन्याय, अत्याचार, वाढते बलात्कार या भीषण समस्या आवासून उभ्या आहेत. कमावत्या महिलांची संख्या वाढली खरी परंतू त्यांच्या कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळही वाढला आहे. जातीय व धार्मिक ध्रुवीकरण वेगाने सुरू आहे. त्यांतून होणाऱ्या हिंसाचाराने तर कळस गाठला आहे. पुरोगामितत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या ऑनर फिलिंगच्या घटना वारंवार घडताना दिसून येत आहेत. गर्भलिंग निदान चाचण्या आणि मुलगी जन्मालाच येऊ नयेत म्हणून होणारे गर्भपात हा प्रश्न गेल्या 25 वर्षात राज्यात मोठा कलंक ठरत आहेत.

शेतीवर अवलंबून असणारा मोठा वर्ग हद्दपार होते आहे. पुरूष शहरी, निमशहरी भागात जाऊन रोजगार शोधतात. परंतू शेतकरी महिला मात्र गावातचे मिळेल ते काम पकडून कुटुंबाची, जनावरांची गुजराण करताना दिसून येतात. त्यातच शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमुळे एक वेगळीच सामाजिक, आर्थिक प्रश्नाचे ओझे या महिलांच्या जगण्यावर लादले गेले आहे. बदलत्या ग्रामीण अर्थकारणाने महिलांच्या जगण्याचे आयामच बदलून गेले आहेत. त्या अधिक दुर्बल, असहाय्य होताना दिसतात. त्यामुळे त्यांना त्यातून बाहेर काढून मुख्य प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध जीवन शैलीमधील महिलांच्या गरजा भागविण्यासाठी लिंगनिपेक्ष दृष्टीकोनातून तयार केलेली सुव्यवस्थित, गरजानां अनुकूल अशी व्यासपीठे आपल्या देशात निर्माण होणे काळाची गरज आहे. शेवटी समान माना, स्त्रिला अबला कोणी समजू नका. देवी म्हणून पुजू नका, वा दासी म्हणून छळू नका. असे फक्त म्हणून चालणार नाही तर ते प्रत्यक्षात उतरविले तरच महिला आर्थिक दृष्टया स्वावलंबी होतील. आणि त्यांचा अर्थकारणात आपोआप हिस्सा वाढेल.

**सारांश** :– 21 व्या शतकात आपण पुढारलेल्या समाजा विषयी कितीही गप्पा मारल्या तरी स्त्रीयांना दिली जाणारी आजची वागणूक अजूनही किती भयानक पद्धतीची आहे हे समजू शकतो. एकूणच राज्यघटनेने कितीही अधिकार दिले, कायदे केले, योजना आणल्या, राखीव जागा दिल्या तरी सुद्धा मात्र अजूनही आपण स्त्रियांच्या एकूणच विकासाविषयी फारच दूर असलेले दिसून येतो. परिणामी काही निवडक स्त्रिया सोडल्या तर आजही 'अर्थकारण' हा विषय कोसो दूरच राहिलेला दिसून येतो.

***संदर्भ सूची*** *:–*


1) *www.wikipedia.org*
2) *www.papers.ssrn.com*
3) *विद्युत भागवत, स्त्रीवादी सामाजिक विचार*
4) *डॉ वैशाली पवार, राजकीय विचार प्रणालीची ओळख डायमंड पब्लिकेशन*
5) *मिलिंदकुमार भिकाजी देवरे, संशोधन पेपर*
6) *साने गिता, भारतीय स्त्री जीवन*
7) *रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा*
8) *नाईक शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद*
9) *जैन निरज, जागतिकीकरण की कवी गुलामगिरी*
10) *धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा, स्वरूप आणि उपाययोजना, दिलिपराजे प्रकाशन पुणे 1993.*